# शब्दांची खोली


तो म्हणतो,
थांब जराशी.
जरा दमानं घे..
उथळ होत चालल्यात
तुझ्या कविता
आणि स्पष्ट होत चाललंय
माझं त्यातील अस्तीत्व!
बरोबर आहे त्याचं
उथळ गोष्टींचा तळ
पटकन दिसतो..
आतलं सगळं
जरासं ढवळताच वर येतं
कविता पण
वरवरची वाटते..
त्याला मग लपता नाही येत-
शब्दांच्या पडद्या आड..
मुक्त संचार नाही करता येत
भावगर्भ डोहाच्या तळाशी
वर एक तरंग सुद्धा न उठवता!
सगळं कसं शांत, स्थिर...
समजतो मला,
त्याचा हा आग्रह!
पण सांगावेसे वाटते त्याला की,
आवर तुझ्या अधीर मनाला,
आणि थांब जरासा तू ही
माझ्या कवितेच्या काठाशी -
तुला लपवू शकणारी खोली,
शब्दांना परत मिळेपर्यंत...

©प्रीती देशपांडे